FORM-1A

0068610

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य / State: महाराष्ट्र, जिल्हा / District: मुंबई, पोलीस ठाणे / Police Station ........, पहिली खबर क्र. / FIR No. 29, वर्ष / Year 2023, दिनांक / Date 14/09/2023

2. (i) अधिनियम Act: अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, कलमे Sections: 7
   (ii) अधिनियम Act: —, कलमे Sections: —
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: —

3. (a) अपराधाची घटना : वार / Occurrence of offence : Day ........, तारीख पासून / Date from 13/09/2022, वेळ / Time ते दि. तारीख पर्यंत / Date to 19/09/2022, वेळ / Time ........
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची / Information received at P. S. तारीख / Date 20/09/2022, वेळ / Time ........
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. / General Diary Reference : Entry No. 17, तारीख / Date 14/09/23, वेळ / Time 13:20

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा / Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.: उत्तरेस 08 कि.मी., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. / Chouki / Beat / O.P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणचे नाव / Address of Occurrence Name: S.R.A कार्यालय, वांद्रा, ठिकाणाचे नंबर / No. if any ........, गल्ली / Ward ........, रस्त्याचे नाव / Name of road ........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण / Nearest identifiable place ........, गाव / Village वांद्रा, पोस्ट / Post —, तालुका / Taluka —, जिल्हा / Dist. मुंबई, राज्य / State महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव / In case, outside the limit of this Police Station —, तालुका / Taluka —, जिल्हा / Dist. —, राज्य / State —

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव / Name: राहुल बाबुराव कारभारी
   (b) वडिलांचे / पतीचे नाव / Father's / Husband's Name: बाबुराव कारभारी
   (c) जन्म तारीख व वय / Date of Birth and Age: पोनि.रक्ष.प्र.शि.मुंबई 43 वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व / Nationality: भारतीय, फोन नं. / Phone No. 8928747524
   (e) पारपत्र क्रमांक / Passport No. ........, दिल्याचा दिनांक / Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण / Place of Issue ........ (f) व्यवसाय / Occupation ........
   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste [illegible], जनजाती Sub-Caste ........
   (h) पत्ता / Address: PSI बिल्डिंग ... पोलिस कॉलनी दादर (पू.) मुंबई, गल्ली / Ward, खर्च नं., घर / नाव नं. / House/Name No. 08, फोन / मो. नं. / Phone/M. No. ........, पॅन नं. / PAN No. ........, वोटर्स नं. / Card No. ........
   रस्त्याचे नाव / Road ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण / Nearest identifiable place ........, गाव / Village ........, पोस्ट / Post ........, पो. स्टे. / P. Stn. ........
   तालुका / Taluka —, जिल्हा / Dist. —, राज्य / State —, सध्याचा पत्ता / Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   उपेंद्र कुडवा, अभियंता एस.आर.ए. कार्यालय वांद्रा.

Y.P.P.-3,200 Bk.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

Scanned by PDF Scanner

फिर्यादी श्री राहुल बाबुराव कारभारी पोलीस निरीक्षक काप्रवि मुंबई यांची फिर्याद स्वतंत्र कागदावर टंकलिखित केली असून तिला प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात यावे.

समक्ष

पोलीस निरीक्षक
काप्रवि मुंबई

राहुल कारभारी
पो.नि. काप्रवि
मुंबई

Scanned by PDF Scanner

## फिर्याद

दि. १४/०९/२०२३

मी राहुल बाबुराव कारभारी वय.४३,धंदा— नोकरी, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.मुंबई रा.ठी.रुम नं.८,पीएसआय बिल्डींग, रेल्वे पोलीस कॉलनी दादर (प) मुंबई —४०००१४ मो.नं.८९२८७४७५२४

---

मी वरील प्रमाणे असून सरकारतर्फे फिर्यादी होवून फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई येथे पोलीस निरीक्षक (एटप) म्हणुन कार्यरत आहे.दि. २०/०७/२०२२ रोजी कार्यालयात असताना सपोआ (प्रशासन) यांनी मला बोलावुन तक्रारदार श्री इंद्रनिल रॉय यांची भेट करुन दिली व सांगीतले की, तक्रारदार यांची तक्रार ऐकुन त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करा त्याप्रमाणे मी तक्रारदार श्री इंद्रनिल राय यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी खालील प्रमाणे हकिकत सांगीतली.

तक्रारदार इंद्रनिल नितीन रॉय धंदा— बांधकाम व्यवसाय रा.ठी. २९ कंथारीया मेन्शन, गोखले रोड,नं.१ दादर (प) मुंबई —४०००२८ मो.नं.९९३०८८३००५. 'हरेकृष्णा डेव्हलपर्स' या नावाने बांधकाम व्यवसाय करतात. सदर व्यावसायात त्यांचे सह इतर दोन भागीदार असुन वर नमुद पत्त्यावर व्यवसाय कार्यालय आहे.

तक्रारदार यांचे सी.टी.सर्वे नं.बी९०६,बी/१(पी.टी.,बी—११५२,बी वार्ड कडेश्वरी मार्ग बांद्रा पश्चिम, मुंबई ५० येथे 'आई कडेश्वरी एसआरए, सीएचएस लिमीटेड' या नावाने झोपडपट्टी धारकांसाठी २० मजली इमारतीच्या प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. सदर प्रकल्पात ५१ टक्के हिस्सा (शेअर) एमएमआरडीए यांचा आहे तर उर्वरीत ४९ टक्के हिस्सा (शेअर) तक्रारदार यांचेसह त्यांचे भागीदार याचां आहे.नमुद प्रकल्प बांधकामाकरीता पुर्व परवानगी घेवून बांधकाम सुरू करण्यात आले आहे. प्रकल्पाकरीता आवश्यक असलेले तांत्रिक परवानगी घेण्याकरीता तक्रारदार यांनी एमएमआरडीए बांद्रा येथे दि.२८/०७/२०२२ रोजी रीतसर अर्ज केला आहे.(प्रत हस्तगत केली आहे.)

नमुद फाईल/प्रपोझलच्या परवानगीच्या संबधाने तक्रारदार हे एस.आर.ए. बांद्रा येथील कार्यालयात अभियंता श्री. उपेंद्र कुडवा यानां सन २०२२ चे जुलै महिन्याचे पहिल्या आठवडयामध्ये भेटले असता त्यांनी त्यावेळी सांगीतले कि, परवानगी हवी असल्यास रु. १५,००,०००/— दयावे लागतील त्यानंतर परवानगी देण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी लोकसेवक अभियंता श्री कुडवा यांचे सांगणेप्रमाणे सन २०२२ चे जुलै महिन्याचे दुसऱ्या आठवडयात त्यांचे कार्यालयात भेटुन ठरलेल्या रक्कमे पैकी ५,००,०००/रु तक्रारदार यांचे आर्किटेक श्री. सुरज सावंत यांच्या मार्फतीने दिले होते. तद्दनंतर देखील तक्रारदार यांचे बांधकामा करीता आवश्यक असलेली परवानगी मिळालेली नाही, म्हणून तक्रारदार हे लोकसेवक अभियंता श्री. उपेंद्र कुडवा यांना परत एकदा भेटले असता त्यांनी उर्वरीत रक्कम दिल्यानंतर परवानगी मिळेल असे सांगून उर्वरीत रकमेची लवकरात लवकर पुर्तता करण्यास सांगितली.

लोकसेवक अभियंता श्री कुडवा यांनी मागणी केलेली रक्कम हि कोणतीही शासकिय शुल्क नसल्याने त्यांनी मागणी केलेली रक्कम ही लाच असल्याने लोकसेवक अभियंता श्री. उपेंद्र कुडवा यांना लाच देण्याची तकादार यांची इच्छा नसल्याने त्यांनी दि. २०/०७/२०२२ रोजी लाप्रवि येथे समक्ष येवून लेखी स्वरूपात स्वहस्ताक्षरात तक्रार दिली आहे.

Scanned by PDF Scanner

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारवरून पडताळणी क्र. ५३/२०२२ अन्वये दोन शासकिय पंचा समक्ष पडताळणी करण्यात आली. दि.२९/०७/२२ रोजी दोन शासकिय पंचासह लोकसेवक श्री कुडवा यांच्या कार्यालयात पडताळणी केली असता, लोकसेवक श्री कुडवा हे त्यांचे कार्यालयात हजर नसल्याने त्यांची भेट होवू शकली नाही. सदरचे संभाषण ध्वनी मुद्रीत झाले आहे व तसा पंचनामा केला आहे. त्यानंतर काही दिवस तक्रारदार हे त्यांचे वैयक्तिक अडचणी मुळे व आजारपणामुळे लाप्रवि कार्यालयात येवू शकले नाहीत. सदर बाबत ठाणे दैनंदिनीस नोंद केली आहे.

तक्रारदार हे पुन्हा दि. १२/०९/२०२२ रोजी लाप्रवि कार्यालयात हजर आले. त्यानंतर त्वरीत दोन शासकिय पंचासह पडताळणी कार्यवाहीचे आयोजन करुन एसआरए कार्यालयात बांद्रा येथिल कार्यालयात अभियंता श्री उपेंद्र कुडवा यांना भेटण्यास गेले असता, त्याचे समक्ष इतर तीन ते चार इसम बसले असल्याने त्यांनी नंतर येण्यास सांगितले. सदरचे संभाषण ध्वनी मुद्रीत झाले आहे व तसा पंचनामा केला आहे.

त्याप्रमाणे दि. १३/०९/२०२२ रोजी पुन्हा दोन शासकिय पंचासह पडताळणी पंचनाम्याचे आयोजन करून तक्रारदार व पंच असे अभियंता श्री कुडवा यांना त्यांचे कार्यालयात भेटले असता त्यांनी तक्रारदार यांचे सोबतचे शासकिय पंच यांचे बाबत चौकशी करून त्यांना **''वेट आऊट''** असे बोलून बाहेर जाण्यास सांगितले. त्यानंतर अभियंता श्री. कुडवा यांनी कामाबाबत चर्चा केली. यापुर्वीचे रू. ५,००,०००/- मिळाले असल्याचे कबुल केले व त्यावेळी **''आता किती बाकी आहेत?''** असे विचारले असता, आर्किटेक खाजगी इसम श्री सुरज सावंत यांनी १०,००,०००/- रू. बाकी असल्याचे सांगितले. त्यावेळी अभियंता श्री. कुडवा यांनी **''होकार दिला ''** व बरोबर असल्याचे सांगीतले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना **''थोडे थोडे इन्स्टॉलमेंट मध्ये देतो''** असे सांगितले असता, त्यांनी **''ठिक आहे''** असे म्हणाले. सदरचे संभाषण ध्वनी मुद्रीत झाले आहे व तसा पंचनामा केला आहे.

त्यानंतर दि. १९/०९/२०२२ रोजी दोन शासकिय पंचासह सापळा कारवाई आयोजित केले. लोकसेवक अभियंता श्री. उपेंद्र कुडवा यांची पंचासह भेट घेतली. त्यावेळी त्यांनी सोबतच्या पंच यांना बाहेर थांबण्याबाबत इशारा करून बाहेर जाण्यास सांगितले त्याप्रमाणे पंच हे केबिन मधून बाहेर गेले. त्यानंतर अभियंता श्री कुडवा यांना रक्कम आणल्याचे सांगितले असता, ''नगद रक्कम ही आर्किटेक श्री **सुरज यांच्याकडे** दया'' असे बोलुन, **''इकडे कोणी येणार नाही, मुले पण नाही आहेत, ईट इज व्हेरी रिस्की''** असे सांगीतले.; ''उदया दया, **फक्त मला सांगा किती आहेत ते...? मग ते बाकी आहे''** अशी विचारणा केली..'' त्यावर तक्रादार यांनी.. 'सर दोन लाख रूपये आहेत... आणि उर्वरीत बुधवार किंवा गुरूवारी देतो. म्हणजे टोटल तुमच्याकडे ... पाच आणि दोन सात झाले कि...पंधराचा विषय क्लोज'' असे सांगीतले असता त्यावर अभियंता श्री. कुडवा यांनी **''नो प्रॉब्लेम सर.. थॅंक्यु''** असे बोलले. कार्यालयात रिस्क असल्याचे सांगुन लाच रक्कम स्वत: स्वीकारण्यास नकार दिला, परंतु नगद लाच रक्कम आर्किटेक खाजगी इसम श्री सुरज सावंत यांचेकडे देण्यास सांगीतले. सदर चे संभाषण हे ध्वनीमुद्रीत झाले आहे. तसा पंचनामा केला आहे.

लोकसेवक अभियंता श्री कुडवा यांचे सांगणेप्रमाणे तक्रादार यांचे मोबाइल फोन क्रमांक ९९३०८८३००५ या वरून श्री सुरज सावंत यांचा मोबाईल क्र. ९८९९३०६६०३ यावर फोनचा स्पीकर ऑन करून पंचा समक्ष संपर्क केला त्यावेळी श्री सुरज सावंत

Scanned by PDF Scanner

यांना सांगितले की, लोकसेवक अभियंता श्री कुडवा यांनी तुमच्याकडे रक्कम देण्यास सांगितले आहे. त्यावेळी श्री.सुरज सावंत यांनी सांगितले कि, ''ते बाहेर असल्याने उदया भेटू असे सांगीतले.''

आर्किटेक खाजगी ईसम श्री सुरज सावंत हे तक्रादार व त्यांचे व्यवसायिक भागीदार यांचे व्यवसायात महत्वाचे कामे करतात तसेच ते त्यांचे कार्यालयात आर्किटेक म्हणून काम करतात. आर्किटेक खाजगी ईसम श्री सुरज सावंत यांस लोकसेवक अभियंता श्री. कुडवा यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई येथे तक्रार दिल्याची माहीती समजल्याने त्यांनी तक्रारदार यांना त्यानंतर भेटण्यास नकार दिला व लोकसेवक श्री कुडवा यांचे कडून परस्पर काम करून घेण्यासाठी सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी लाचलुचपत विभागाचे कार्यवाहीबाबत गोपनियता ठेवण्याबाबत आर्किटेक खाजगी इसम श्री. सुरज सावंत यांना सांगितले असल्याचेही तक्रारदार यांनी मला समक्ष भेटून कळविले.

''तक्रादार श्री इंद्रनिल राय यांचे बांधकामाचे परवागीचे प्रकरण अद्याप लोकसेवक गैरअर्जदार श्री कुडवा यांचेकडे प्रलंबित असुन लोकसेवक श्री उपेंद्र कुडवा हे आर्किटेक खाजगी इसम श्री सुरज सावंत यांच्या मध्यस्तीने आता लाच स्विकारणार नाही. लाच दिल्याशिवाय लोकसेवक आमचे काम करणार नाहीत, त्यामुळे आम्ही त्यांना स्वतः भेटून प्रयत्न करतो, असे तक्रारदार यांनी वेळोवेळी सांगितल्यामुळे व तशी खात्री दिल्यामुळे सापळा कारवाई सुरू ठेवण्यात आली होती.

बराच कालावधी उलटुनही तक्रारदार यांचेकडुन काहीच प्रतीसाद मिळत नसल्याने तक्रारदार यांना बोलावून गै.अ. यांचे विरूध्द लाचेची मागणी केल्याची तक्रार देण्यास सांगण्यात आले परंतु त्यांनी काही ना काही कारण सांगुन तक्रार देण्यास कार्यालयात उपस्थित राहीले नाहीत. याबाबत ठाणे दैनंदिनीत वेळोवेळी नोंदी घेण्यात आल्या आहेत.

तक्रार दाखल करण्यास खुप उशीर होत असल्याने पुन्हा पुन्हा तक्रारदारास संपर्क करण्यात आला असता तक्रारदार यांनी दि. ११/०७/२०२३ रोजी स्वहस्ताक्षरात व दि. १२/०७/२०२३ रोजी ईमेलव्दारे लेखी कळविले की गै.अ. लोकसेवक श्री. कुडवा यांचेविरूध्द तक्रार दिल्यास तक्रारदार यांचे व्यवसायावर गंभीर परिणाम होवून त्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता वर्तविली त्या भितीपोटी लोकसेवक श्री. कुडवा यांचे विरूध्द तक्रार देण्यास नकार दिला. यावरून तक्रारदार तक्रार देण्यास येणार नाहीत याची खात्री झाली तक्रारदार यांचे मुळ तक्रारीस अनुसरून गै.अ. लोकसेवक श्री. कुडवा यांनी लाचेची मागणी केल्याबाबत केलेल्या पडताळणी कारवाई/पंचनामा यादरम्यान लोकसेवक श्री. कुडवा यांनी लाच मागणी केल्याचे निष्पन्न होत आहे.

तरी लोकसेवक श्री उपेंद्र कुडवा, अभियंता, ए.एस.आर.ए. बांद्रा कार्यालय, मुंबई यांनी तक्रादार श्री इंद्रनिल नितीन राय, धंदा– बांधकाम व्यवसाय रा.ठी. २९ कंथारीया मेन्शन, गोखले रोड,नं.१ दादर (प) मुंबई. यांचे बांधकामास आवश्यक असणारी परवानगी देण्याकरीता दि.१३/०९/२०२२ व दि.१९/०९/२०२२ रोजीचे पडताळणी दरम्यान

Scanned by PDF Scanner

रू. १५,००,०००/- लाचेची मागणी करुन ती स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने मी सरकारतर्फे फिर्यादी होवून लोकसेवक श्री. उपेंद्र कुडवा यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे तक्रार देत आहे.

समक्ष

ही फिर्याद दिली.

(मनोज जिरगे)
पोलीस निरीक्षक, लाप्रवि मुंबई

15/9/23
(राहुल कारभारी)
पोलीस निरीक्षक, लाप्रवि मुंबई

Scanned by PDF Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे आज रोजी समक्ष तक्रार दिल्याने
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे. —
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य —
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) —

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

तक्रारदार इंद्रनील नितीन रॉय हे बांधकाम व्यावसायीक असून आई कडून श्री एच.आर.ए. प्रोमेटर्स लिमीटेड या नावाने झोपडपट्टी धारकांसाठी २० मजली प्रकल्पाचे बांधकाम सुरु असून नमूद फाईलच्या प्रयोजन परवानगीसाठी एस.आर.ए. बांद्रा कार्यालयातील अधिकारी उपेंद्र कुडवा यांनी 15,00,000/- ची लाचेची मागणी केलेबाबत ला.प्र.वि. मुंबई येथे दिलेल्या तक्रारीवरून दि. 13/09/2022 व दि. 14/09/2022 रोजी केलेल्या पडताळणी मध्ये रु 15,00,000/- लाचेची मागणी करून ती स्विकारण्यास मान्य केल्याचे निष्पन्न झाले वरून पो.नि. कारखानीस यांनी सरकारतर्फे फिर्याद देऊन फिर्याद दिल्याने गुन्हा

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
मनोज हिंदूराव शिरगे पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. मुंबई.
2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, —
3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन — , जिल्हा — , राज्य —
Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :
(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank................ No................ to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to................................................ (3) Transferred to P. S. ................................................ District................................................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा 15/9/23
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name मनोज हिंदूराव शिरगे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ................
Posting ला.प्र.वि. मुंबई
Code No. of I. O. ................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 15/09/2023
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned by PDF Scanner